सकाळ

# मगर महाविद्यालयाकडून सायबर सुरक्षेसंबंधी करार

**हडपसर, ता. १५ :** येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात सायबर सुरक्षेसंबंधी सामंजस्य करार झाला. प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे आणि फाउंडेशनचे प्रमुख अजय शिर्के यांनी या करारावर स्वाक्षरी केली.

या करारांतर्गत महाविद्यालयातील २० विद्यार्थी परिसरातील शाळांमध्ये सायबर सुरक्षेसंबंधी कार्यक्रम घेणार आहेत, तसेच मगर महाविद्यालयातही सर्व विद्यार्थ्यांमध्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विविध सामाजिक संस्था, कंपनी कर्मचारी, महिला बचत गट, इतर औद्योगिक संस्थांमधील कर्मचारी आदींना हे विद्यार्थी सायबर सुरक्षेसंबंधी प्रशिक्षण देणार आहेत. याशिवाय या करारामुळे विद्यार्थ्यांना वेगळे कौशल्य प्राप्त करण्याची संधी मिळणार असल्याचे डॉ. घोरपडे यांनी सांगितले. डॉ. प्रशांत मुळे, प्रा. मनीषा गाडेकर यांनी संयोजन केले.

Pune, Hadapsar-Today
16/06/2025 Page No. 5